myresearchgo

myresearchgo Volume 2, Issue 3, March 2026, ISSN: 3107-3816 (Online)

# वैदिक काळातील स्त्रियांचे सबलीकरण आणि आधुनिक काळातील स्त्रियांचे सक्षमीकरण: एक तुलनात्मक अभ्यास

संशोधिका,

डॉ. शारदा विजय निवाते,

सहा. शिक्षिका छ.शि.मं. कल्याणचे

माध्यमिक विद्यामंदिर, रातवड, ता. माणगाव, जि. रायगड

9561114425

shardaniwate@gmail.com

प्रस्तुत शोधनिबंधात वैदिक काळातील स्त्रिया आणि आधुनिक काळातील स्त्रिया यांचे त्या त्या काळातील समाजातील स्थान आणि सामाजिक योगदान यांचा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे. कोणत्याही काळातील स्त्रीचा सन्मान आणि तिच्या स्वाभिमानाचे रक्षण यावर प्रभाव टाकणारे काही मूलभूत घटक आहेत. स्त्रीची स्वत:ची विवेकबुद्धी, शहाणपण, सक्षमता आणि स्वावलंबन हे घटक तिचे सबलीकरण करण्यात मोठी भूमिका बजावतात. संस्कारांनी व्यक्तीला शहाणपण व समंजसपणा प्राप्त होतो. तर शिक्षणाने व्यक्तीला आत्मसन्मान व आत्मविश्वास प्राप्त होत असतो. वैदिक काळातील समाजव्यवस्था त्या काळातील स्त्रीशिक्षणाला पूरक आणि पोषक होती का? आधुनिक काळातील समाजव्यवस्था स्त्रीला खऱ्या अर्थाने सक्षम करण्यास समर्थ आहे का? या आणि अशा मुलभूत प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा या शोधनिबंधात प्रयत्न केलेला आहे. तसेच काही वैशिष्ट्यपूर्ण उदाहरणे यात नमूद केली आहे. प्रामुख्याने वैदिक काळातील स्त्रियांचे शिक्षण आणि आधुनिक काळातील स्त्रियांचे शिक्षण यासंदर्भात व्यापक दृष्टीकोनातून सदर शोधनिबंधात सविस्तर चर्चा केली आहे.

प्रस्तुत शोधनिबंधात वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केलेला आहे.

**(बीज संज्ञा: वैदिक काळ, सबलीकरण, आधुनिक काळ, सक्षमीकरण)**

## प्रस्तावना

वेद आणि वेदांत (उपनिषदे) यांमधील तत्वज्ञानाच्या निर्मितीचा काळ हा साधारणपणे इसवी सन पूर्व १५०० ते ३०० दरम्यानचा काळ मानला जातो. वेद हे सुरुवातीला मौखिक परंपरेने अभिजन समाजात रूढ झाले आणि कालांतराने लिपीबद्ध झाले. ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद, आणि अथर्ववेद हे चार वेद आणि त्या अनुषंगाने निर्माण झालेले इतर वैदिक साहित्य मानवी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी तयार झालेल्या संहिता आहेत.

प्रस्तुत शोधनिबंधात नमूद केलेला 'वैदिक काळातील स्त्रियांचे सबलीकरण' हा एक मुद्दा प्रथम चिंतनासाठी घेतला तर तत्कालीन स्त्री जीवनावर प्रकाश टाकणे अनिवार्य ठरेल. वैदिक काळातील 'ऋग्वेद' सर्वात प्राचीन वेद मानला जातो. प्रामुख्याने ऋग्वेदात आणि बृहदारण्यक उपनिषदात वैदिक काळातील स्त्री जीवन स्पष्टपणे पहावयास मिळते. या साहित्याच्या आधारे प्रथम वैदिक काळातील स्त्री जीवनाचा अभ्यास करता येईल. त्यासोबत आधुनिक काळातील स्त्रीची सक्षमता यांची योग्य ती सांगड घालणे शक्य होईल.

## अभ्यासाची उद्दिष्टे:

१. वैदिक काळातील स्त्रीजीवन व तत्कालीन स्त्रियांचे सबलीकरण यांचा अभ्यास करणे

२. वैदिक काळातील स्त्री व आधुनिक काळातील स्त्रीयांच्या सक्षमीकरणाचा तुलनात्मक अभ्यास करणे

## कार्यकारी व्याख्या

**वैदिक काळ:** भारतीय उपखंडाच्या इतिहासातील इ.स.पू. १५०० ते ५०० वर्षांचा काळ ज्या काळात चार वेद व संबंधित साहित्याची निर्मिती झाली.

**आधुनिक काळ:** इ.स. १८१८ नंतरच्या काळाला सामान्यपणे आधुनिक काळ म्हटले जाते

**सबलीकरण:** प्रस्तुत ठिकाणी स्त्रीने स्वत: शिक्षण व विद्या प्राप्त करून सन्मानाने जीवन जगणे हा अर्थ अभिप्रेत आहे

**सक्षमीकरण:** प्रस्तुत ठिकाणी स्त्रीने स्वत: शिक्षण घेऊन सक्षम होणे व इतरांना सक्षम करण्यासाठी कार्यक्षम होणे हा अर्थ अपेक्षित आहे

**myresearchgo Volume 2, Issue 3, March 2026, ISSN: 3107-3816 (Online)**

**व्याप्ती आणि मर्यादा**

**व्याप्ती:** प्रस्तुत शोधनिबंधाची व्याप्ती सर्व वेद व सर्व उपनिषदे यामधील स्त्रीजीवनाच्या समग्र
अभ्यासापर्यंत नेता येईल

**मर्यादा:** प्रस्तुत केवळ शोधनिबंध ऋग्वेद व बृहदारण्यक उपनिषदे यांमधील संदर्भांच्या आधारे तत्कालीन स्त्रियांचे सबलीकरण व आधुनिक काळातील स्त्रीयांच्या सक्षमीकरणाच्या तुलनात्मक अभ्यासापुरते मर्यादित राहील.

**वैदिक काळातील समाजजीवन**

वैदिक काळात स्त्री आणि पुरुष यांना समाजात समान आदर होता. त्यासाठी कर्तृत्व हा निकष होता हे लक्षात येते. विद्वता आणि पराक्रम यामध्ये सरस असणारे स्त्री आणि पुरुष या दोघांचाही सन्मान होत असे. ज्ञान मिळविण्याचा आणि ते समाजाला प्रदान करण्याचा अधिकार सर्वांना होता. अतिप्राचीन असलेल्या ऋग्वेदाच्या सुरुवातीच्या काळात ब्राह्मण. क्षत्रिय, आणि वैश्य अशी व्यवसायावर आधारित समाजरचना होती. या तीनही रचनेतील विद्वान व अभ्यासू स्त्रीपुरुषांनी ऋग्वेदातील सूक्ते रचल्याचे उल्लेख आहेत. ऋग्वेदाच्या उत्तरकाळात शूद्र हा समाज घटक दिसून येतो. परंतु त्यावेळी समाजात त्यांनाही सन्मानाची वागणूक होती. अश्वमेधासारख्या मोठ्या यज्ञ समारंभात सूत, मागध, नट इ. व्यवसायाने शुद्र म्हटले गेलेले व दासीपुत्र व त्यांचे वंशज म्हणून शुद्र मानले गेलेले लोक इतिहास, पुराणे रचून गाऊन म्हणून दाखवीत असत. एकंदरीत ब्रह्मविद्या समाजाच्या सर्व थरात पोहोचली होती. छांदोग्य उपनिषदातील उल्लेखानुसार, षोडशकल ब्रह्माचा द्रष्टा सत्यकाम जाबाल हा दासीपुत्र होता असे समजते. तर दृश्य विश्वाच्या विलायानाचे तत्वज्ञान 'ज्ञानश्रुती' सांगणारा रैक्व ऋषि गाडीवान होता व राजा स्वत: शुद्र होता. दासिपुत्रांचे वंशज कावषेय हे यज्ञाचे अध्यात्मिक गूढ विषद करणारे तत्वज्ञ असे महाऐतरेय उपनिषदात म्हटले आहे. स्त्रीशुद्रादिक समाजाविषयी असे अनेक सन्माननीय दाखले आहेत. पूर्व वैदिक कोणत्याही प्रकारची अन्यायकारक जातीव्यवस्था नव्हती. स्त्री आणि पुरुष असाही भेदभाव केला जात नव्हता. किंवा त्यानुसार कोणतीही भिन्न नियम किंवा बंधने नव्हती असे अभ्यासाअंती दिसून येते. एकंदरीत, व्यक्तीची विद्वत्ता ही त्याच्या सन्मानाचे प्रमाण मानली जात होती.

**वैदिक काळातील स्त्री जीवन**

केवळ चूल आणि मूल यांतच गुंतून न राहता अभ्यासपूर्ण पद्धतीने ब्रह्मविद्या प्राप्त करणाऱ्या अनेक विद्वान स्त्रिया वेद व वेदांत काळात होत्या. "सम्राट जनकाच्या ब्रह्मवादी सभेत याज्ञवल्कना अनेक तात्विक, गहन प्रश्न विचारून त्रस्त करणारी स्त्री गार्गी त्या काळातील स्त्रियांच्या सांस्कृतिक पातळीची उत्कृष्ट निदर्शक होती." असे मंगला आठलेकर लिहीतात. याज्ञवल्क यांची पत्नी मैत्रेयी ही देखील विदुषी होती. त्याकाळी स्त्री ही पुरुषांच्या बरोबरीने समाजात कृतीशील होती. वैदिक काळात केवळ स्त्री किंवा केवळ शुद्र गणल्या गेलेल्या समाजरचनेतील व्यक्ती म्हणून कोणाचा अनादर केला जात नव्हता.

**वैदिक काळातील स्त्रियांचे सबलीकरण**

वस्तुत: वैदिक काळात स्त्रीला अबला किंवा दुय्यम मानलेले दिसत नाही. त्यामुळे वैदिक काळात तिच्यासाठी वेगळे नियम किवा कायदे केलेले दिसून येत नाहीत. स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या ऋग्वेदातील अनेक ऋचा प्रसिद्ध आहेत. तिच्या विद्वत्तेचा आणि गुणवत्तेचा यथोचित सन्मान होत होता. समाजातील ज्ञानमार्ग प्रत्येक घटकासाठी खुला होता. स्त्रीला स्वत:च्या व्यवसायाच्या निवडीचे स्वातंत्र्य होते. वैदिक काळात विवाहसंस्थेला धार्मिक अधिष्ठान दिलेले दिसते. परंतु स्त्री किंवा पुरुषांनी विवाह केलाच पाहिजे असे बंधन मात्र कोणावरच नव्हते.

'भद्रा वधूर्भवती यत्सुपेशा: स्वयं सा मित्रं वनुते जने चित|" ( ऋग्वेद १०.२७.१२)

ऋग्वेदातील या ऋचेमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे तत्कालीन समाजाने स्त्रीला आपला पती निवडण्याचे स्वातंत्र्य बहाल केले होते. पत्नी ही घरातील केंद्रबिंदू असे. तिच्या स्वतंत्र निर्णयक्षमतेचा आदर केला जात असे. विचार, उच्चार, आहार आणि विहाराचे स्वातंत्र्य तिला होते. विवाहित स्त्रीला खऱ्या अर्थाने 'अर्धांगिनी' म्हणून प्रत्येक सामाजिक व धार्मिक समारंभात मान होता. परंतु एखाद्या स्त्रीने तिच्या अध्यात्मिक उन्नतीसाठी विवाह न करण्याचे ठरविले तर तो तिचा अधिकार समाजमान्य असे. अशी स्त्री त्यावेळी सन्मानाला पात्र होती. आजन्म पित्याच्या घरी राहून ज्ञानार्जन करून ज्ञानदानाचे कार्य करणाऱ्या स्त्रियांची उदाहरणे ऋग्वेदात आहेत. ( ऋग्वेद २.१७.७) असे असले तरी काहीच विशेष कार्य न करता अविवाहित स्थितीत पित्याच्या घरी राहणाऱ्या स्त्रियांना मात्र समाजात मानाचे स्थान नव्हते. येथे स्त्री म्हणून नव्हे तर, कर्तृत्वहीन स्त्री म्हणून

myresearchgo Volume 2, Issue 3, March 2026, ISSN: 3107-3816 (Online)

तिला मान मिळत नसे. एकंदरीत विद्वत्ता आणि कर्तृत्व या गोष्टी त्या काळी समाजातील प्रत्येक घटकासाठी विशेष महत्वपूर्ण आणि सन्मान्य मानल्या जात होत्या. याबाबतीत स्त्री, पुरुष किवा सामाजिक स्तर हा निकष मानला जात नसे. स्त्री शिक्षण हे निव्वळ साक्षरतेपुरते मर्यादित नव्हते. तर सखोल ज्ञानाची प्राप्ती करून वेद सूक्ते रचणाऱ्या अनेक स्त्रिया त्या काळात दिसतात. (जसे, लोपशा ऋग्वेद १.१२६.७, विश्वाधारा- ऋग्वेद ५.२८, घोषा- ऋग्वेद १०.४०, इंद्राणी- ऋग्वेद १०.१४५, शची-१०.१५९, अपाला-८.९१)

ऋग्वेद काळात स्त्रीयांच्या सबलीकरणाचा प्रश्न गहन नव्हता. स्त्री पुरुष समानता यासाठी विशेष काही करण्याची गरज नव्हती. सामाजिक जीवनात स्त्री सबला होती. तिला समान अधिकार होते. कुटुंबातील तिचे स्थान अग्रणी होते. तिच्यावर विनाकारण कोणतीही बंधने लादलेली नव्हती. पतीच्या हयातीत ती जसे सन्मानाचे जीवन जगत असे. तसेच सन्मानाचे जीवन ती तिच्या पतीच्या निधनानंतर जगू शकत होती. तिला पुनर्विवाहाचा अधिकार होता. आजन्म अविवाहित राहणाऱ्या स्त्रीला तिच्या कुटुंबातील संपत्तीचा वाटा मिळत असे. (ऋग्वेद २.१७.७)

उपनिषद काळातही स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीने स्थान होते. बृहदारण्यक उपनिषदात "स्त्रीमुळे पुरुषाला पूर्णत्व मिळते,' असा उल्लेख आहे. पत्नीला 'अर्धांगी' म्हटले आहे.
स इमम् एव आत्मानम् द्वेधा अपातयत, ततः पतीश्च पत्नी च अभवताम् (बृ. उप. १.४.३)
असे म्हणत याज्ञवलक्य यांनी खऱ्या अर्थाने स्त्री व पुरुष यांना समान सन्मान असलेला समाज निर्माण करण्याची प्रेरणा यातून दिली आहे.
स्त्रीचे महत्व वेद आणि वेदांत काळातील साहित्यात वर्णिलेले आहेच. मनुस्मृतीमध्येही स्त्रीचे श्रेष्ठत्व पुढीलप्रमाणे अधोरेखित केलेले आहे.
उपाध्यायान्दशाचार्य आचार्याणां शतं पिता।
सहस्रं तु पितृन्माता गौरवेणातिरिच्यते।। (मनुस्मृती - २/१४५)
(दहा उपाध्यायांपेक्षा एक आचार्य श्रेष्ठ असतात, शंभर आचार्यांपेक्षा पिता श्रेष्ठ असतात आणि पित्यापेक्षा हजार पटींनी माता श्रेष्ठ गुरू समजली जावी.)

**वैदिक काळ आणि आधुनिक काळ या दरम्यानचा काळ**

वैदिक काळ आणि आधुनिक काळ या दरम्यानच्या काळात भारतातील स्त्रियांची सामाजिक व शैक्षणिक स्थिती यात मोठीच तफावत असलेली दिसून येते. भारताचे सुवर्णयुग मानले गेलेल्या वैदिक काळानंतर भारतावर अनेक परकीय आक्रमणे झाली. त्यात भारतीय संपत्तीची खूप मोठी लूट झाली. तसेच स्त्रियांवर अपरिमित अत्याचार झाले. यामुळे स्त्रियांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला. स्वाभाविकपणे त्यातून स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर बंधने आली. हळूहळू स्त्रीपुरुष समानतेच्या जागी पुरुषप्रधान संस्कृती मूळ धरू लागली. स्त्री शिक्षणाचे प्रमाण नगण्य झाले. किंबहुना स्त्रीला व्यवहारापुरती अक्षरओळख झाली तरी पुरे, इतके स्त्रीचे शिक्षण मर्यादित झाले. सखोल अभ्यास करून वेद्सुक्ते लिहिणारी विद्वान स्त्री जवळजवळ नामशेष झाली. चूल आणि मूल यासोबत काही घरगुती सण समारंभ तेथील पारंपारिक गाणी, नृत्य, नटणे-सजणे, इ. गोष्टींपुरते स्त्रीचे जीवन मर्यादित झाले होते. इसवी सनानंतर शेकडो वर्षांनी उदयास आलेल्या महानुभाव, वारकरी संप्रदायातील समतावादी विचारधारेने आध्यत्मिक स्तरावर स्त्री स्वातंत्र्याच्या पुनरुज्जीवनाला सुरुवात झाली. सर्वसामान्य कुटुंबातील स्त्रीलाही जगण्याचा एक नवा मार्ग मिळाला. प्रामुख्याने वारकरी संप्रदायाच्या सामाजिक आणि धार्मिक कामगिरीचा एक परिणाम म्हणून स्त्रियाही भक्तीमार्गाच्या वाटचालीत पुरुषांच्या बरोबरीने सहभागी झाल्या. संतसाहित्यात स्त्री संतांच्या रचनेची भर पडू लागली. वेदसूक्ते लिहिणारी स्त्री या काळात अभंगरचना करू लागली. संत महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई, गोणाई, राजाई, बहेणाबाई, सोयराबाई, निर्मळाभागुबाई, कान्होपात्रा अशा अनेक संत कवयित्री त्यांच्या काव्यातून व्यक्त झाल्या. अज्ञानाच्या अंधारात सापडलेल्या समाजाला संतांनी व संतकवयित्रींनी भक्ती, मानवता, आत्मोन्नती, मानवी श्रेष्ठता, स्त्रीप्रतिष्ठा, आणि आत्मसन्मानाने जगण्यासाठी ज्ञानाचा मार्ग सांगितला. यादवकाळातील संतकवयित्रींचे अभंग व इतर लेखन हे तत्कालीन सामाजिक वास्तवाचे आणि आत्मसंघर्षाचे प्रतिबिंब आहे. संतकवयित्रींनी सामाजिक जाणिवा वास्तवपणे शब्दांकित केलेल्या आहेत. त्यामुळे संतकवयित्रींची चळवळ ही एक अर्थाने स्त्री मुक्तीचीच चळवळ होती असे म्हणावे लागेल.

**आधुनिक काळातील स्त्रियांचे सक्षमीकरण**

भारतात इंग्रजांची सत्ता दृढमूल झाल्यानंतरच्या काळाला म्हणजे १८१८ नंतरच्या काळाला सर्वसाधारणपणे आधुनिक काळ म्हटले जाते. एकोणिसाव्या शतकापर्यंत स्त्री शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झालेले दिसत नाही. त्यासाठी अनेक समाजसुधारकांना तत्कालीन समाजधुरिणांचा विरोध पत्करून स्त्रीशिक्षणासाठी पुढे यावे लागले. प्रसंगी संघर्ष करावा लागला. महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्त्रीशिक्षणाचे कार्य हा आधुनिक काळाच्या सुरुवातीच्या टप्प्यातील मोठा यशस्वी लढा

म्हणावा लागेल. सावित्रीबाई फुले यांच्यासोबत पंडिता रमाबाई, फातिमा शेख, ताराबाई शिंदे, आनंदीबाई जोशी या तत्कालीन काही सुशिक्षित स्त्रियांचा नामोल्लेख करणे आवश्यक आहे. कारण त्यांनी स्वत: शिक्षण घेऊन समाजातील इतर स्त्रियांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे मोठे कार्य केले. समाजातील प्रत्येक स्त्री शिकून सक्षम व्हावी यासाठी त्यांनी आटोकाट प्रयत्न केले.

एकविसाव्या शतकात प्रत्येक क्षेत्रात उच्च शिक्षण घेऊन उच्च पदावर कार्यरत असलेल्या स्त्रिया दिसतात. अवकाशात महिनोंमहिने राहून संशोधन करणारी स्त्री जितकी सक्षम आहे तितकीच पेट्रोल पंपावर आत्मविश्वासाने गाड्यांमध्ये पेट्रोल भरणारी सामान्य शिक्षित स्त्रीदेखील सक्षम आहे. राष्ट्रपदी पदावर काम स्त्री जितकी सक्षम आहे तितकीच माणसांनी गच्च भरलेल्या एसटी मध्ये वाहकाचे काम करणारी स्त्री सक्षम आहे. ही प्रत्येक स्त्री स्वत:च्या कुटुंबाबरोबरीने समाजाचे आणि देशाचेही देणे लागते या जाणीवेने काम करते. पहिली महिला इंजिनियर म्हणून टाटा मोटर्स मध्ये काम मिळविलेल्या सुधा मूर्ती यांनी नंतर इन्फोसिस फौंडेशनच्या माध्यमातून समाजात आरोग्य क्षेत्रात, शिक्षण क्षेत्रात आणि आवश्यक तेथे सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या. ग्रामीण व दुर्गम भागातील शेकडो शाळांमध्ये संगणक व ग्रंथालये दिली. २०२४ मध्ये त्यांची राज्यसभा सदस्य म्हणून नियुक्ती झाली. तेथेही कमी कालावधीत त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटविला. भारताच्या पहिल्या महिला केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी संसदेत मांडलेले अर्थसंकल्प त्यांच्या सक्षमतेची साक्ष देतात. तसेच संरक्षण मंत्री म्हणून केलेली कामगिरीसुद्धा उल्लेखनीय आहे. प्रत्येक क्षेत्रात स्वत:च्या बुद्धिचातुर्याचा ठसा उमटवीत कार्य करणाऱ्या स्त्रियांची मोठी यादीच होईल.

वैदिक काळ आणि आधुनिक काळ हा स्त्रीच्या सर्वांगीण विकासासाठी सुवर्णयुग मानला तरी त्या दरम्यानचा एक मोठा कालखंड स्त्रियांसाठी एका अंधारयुगासारखा भयंकर होता. मधल्या काळातील शेकडो वर्षे ती पुरुषप्रधान संस्कृतीचा बळी ठरत होती. एका विशिष्ट कालखंडात स्त्रीभ्रूण हत्या आणि हुंडाबळी या घटना मोठ्या प्रमाणात घडत होत्या. शिक्षण घेण्यासाठी तिला संघर्ष करवा लागत होता. मुलगा हा वंशाचा दिवा म्हणून त्याला विशेष वागणूक दिली जात होती. आता परिस्थिती बदलत आहे.

अनुभव हा मोठा गुरू आहे. सार्वत्रिक अनुभवातून पालकांची मानसिकता बदलत आहे. आज मुलगी जन्माला आली की त्या 'नन्ही परी'चे आनंदाने विशेष स्वागत होते. लग्न होऊन गेलेली मुलगीसुद्धा पालकांना मोठा भावनिक आधार वाटते. मुलीने उच्चशिक्षित व्हावे. स्वावलंबी व्हावे यासाठी पालक प्रयत्नशील दिसतात. उच्च माध्यमिक स्तरापर्यंत मुलींना मोफत शिक्षण मिळते. शिक्षणाच्या पायाभरणीच्या काळात अर्थकारण आड येत नाही. पुढील शिक्षणातही मुलगा असो किंवा मुलगी, हुशार व होतकरू विद्यार्थ्यांसाठी अनेक शिष्यवृत्त्या उपलब्ध आहेत. अनेक बिनसरकारी संस्था मदतीचा हात पुढे करताना दिसतात. अर्धवेळ अर्थार्जन करून स्वत:चे उच्चशिक्षण पूर्ण करणारे अनेक विद्यार्थी दिसतात. त्यामुळे शिक्षणाची दुर्दम्य इच्छा असणाऱ्या व मेहनतीची तयारी असणारा कोणीही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू शकत नाही.

आजच्या विज्ञानयुगात शिक्षणाची कास धरून स्वावलंबी झालेली स्त्री अनेकविध क्षेत्रात समाजाचे नेतृत्व करीत आहे. गुणवत्ता यादीत मुलींनी बाजी मारणे आता सामान्य घटना झाली आहे. अपवादात्मक परिस्थितीत एखाद्या मुलीला शिक्षण घेण्यासाठी अडथळे येत असतील तर सामाजिक दायित्व म्हणून इतर स्त्रियांनी तिला मदतीचा हात देऊन शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले पाहिजे. इतरांना 'मदत करण्यातील सक्षमता' स्त्रीने पुढे येऊन दाखविली पाहिजे.

**उद्दिष्टनिहाय निष्कर्ष**

वैदिक काळ आणि आधुनिक काळ यामधील स्त्रीयांच्या कर्तृत्वाचा तुलनात्मक अभ्यास केला तर पुढील गोष्टी लक्षात येतात-

१. वैदिक काळात समाजजीवनात प्रत्येक क्षेत्रात स्त्री-पुरुष समानता होती. अनेक शतकांच्या मध्यन्तरानंतर आधुनिक काळातही जवळजवळ सर्व क्षेत्रात स्त्री-पुरुष समानता दिसून येते.
२. वैदिक काळात स्त्रिया स्वत:चे शिक्षण पूर्ण करून नंतर स्वेच्छेने विवाह करू शकत होत्या. एखाद्या स्त्रीला विद्याभ्यासात मग्न राहून आजन्म ब्रह्मचर्य पालन करण्याची इच्छा असेल तर ती स्वत: त्यानुसार निर्णय घेऊ शकत होती. आधुनिक काळातही सक्षम स्वावलंबी स्त्री याप्रमाणे स्वतंत्र निर्णयक्षमता राखून जीवन जगत आहे.
३. वैदिक काळात बालविवाह प्रथा नव्हती. आधुनिक काळात बालविवाह हा कायदेशीर गुन्हाच आहे.
४. वैदिक काळात स्त्रीला कौटुंबिक मालमत्तेत तिचा वाटा मिळत असे. आधुनिक काळात वडिलार्जित संपत्तीत कायद्याने स्त्रीला समान हक्क आहे.
५. वैदिक काळात म्हणजे सुमारे साडेतीन हजार वर्षांपूर्वी स्त्री शिक्षण ही सामान्य गोष्ट होती. त्यासोबत विद्याभ्यास करून पुरुषांच्या बरोबरीने सर्व धार्मिक सामाजिक कार्यात ती सन्मानाने नेतृत्व करून सहभागी होऊ शकत होती. आधुनिक काळातही शिक्षणाची सर्व क्षेत्रे काबीज केलेली स्त्री तितकेच सन्मानाचे जीवन जगत आहे

myresearchgo Volume 2, Issue 3, March 2026, ISSN: 3107-3816 (Online)

एकंदरीत, वैदिक काळ आणि आधुनिक काळ हा स्त्रियांचे सबलीकरण आणि सक्षमीकरण या दृष्टीने सकारात्मक भूमिका बजावताना दिसतो.

**संदर्भ सूची**


आठलेकर मंगला, (२००६), ‘ गार्गी अजून जिवंत आहे’, ४थी आवृत्ती, राजहंस प्रकाशन, पुणे. पृ. ५५,६०-६५

डॉ. बसवंते माधव, (२०२०), ‘महाराष्ट्रातील संत कवयित्री’, भारतीय प्रकाशन, नांदेड. पृ.५

डॉ. बाबर सरोजिनी (१९६८), ‘स्त्रीशिक्षणाची वाटचाल’ मुंबई

डॉ. गोसावी कुमुद, (२०१५), ‘गिरीजा’, अनमोल प्रकाशन, पुणे.

पै वामनराव, ( २०११), ‘स्त्रियांशी हितगुज जीवनविद्येचे’, जीवनविद्या मिशन, मुंबई.

स्वामी रंगनाथानंद, (२०१६), ‘बृहदारण्यक उपनिषदांचा संदेश’, रामकृष्ण मठ, नागपूर. पृ. २५, ५६४-५६६

संपा. इनामदार हे.वि., खोले विलास, (१९८८), ‘भक्तीगंगेच्या वाटेवर’, संजय प्रकाशन, पुणे पृ.

https://en.wikipedia.org/wiki/Vedic_period

https://vishwakosh.marathi.gov.in/23283/